Desktop/प्रस्थापना letter

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
लेखा विभाग, ७४५७३
क्र.लेखा/७अ/कावि/१५५८/२०१८
दिनांक :- १८/१२/२०१८

**विषय :- नागरी स्थानिक संस्थामार्फत राबविणेत येणा-या निविदा प्रक्रियेबाबत...**

**परिपत्रक**

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासनाच्या निधीतुन किंवा स्वत:चे निधीतुन कामे करताना ई. निविदा पध्दतीचा अवलंब करावा तसेच सदरची निविदा प्रक्रिया राबविताना कोणती दक्षता घेणेत यावी, या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीच्या सुचना उपसचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन परिपत्रक क्र संकीर्ण – २०१८/प्र.क्र ५३९/नवि-२० दि. ८ जून २०१८ अन्वये सर्व म.न.पा, नगरपालिका, नगरपंचायत यांचा निर्गत केलेल्या आहेत. सोबत सदर परिपत्रकाची प्रत कार्यवाही कामी जोडून पाठविली आहे.

तरी सर्व विभागप्रमुखांनी निविदा प्रक्रियेसंदर्भात उपरोक्त शासन परिपत्रकात नमूद सूचना व तरतूदी प्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही चालू ठेवावी. तसेच यापुढे शासनाचे विषयांकित बाबत वेळोवेळी निर्गत होणारे आदेश, परिपत्रके शासनाचे वेबसाईट वरुन प्राप्त करुन घेणेत यावेत व त्यानुसार अंमलबजावणी करावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रति – सर्व शाखाप्रमुख

नागरी स्थानिक संस्थांमार्फत राबविण्यात
येणाऱ्या निविदा प्रक्रियेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१८/प्र.क्र.५३९ /नवि-२०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-०८ जून, २०१८.

वाचा- लोकलेखा समिती (२०१७-२०१८) (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) अठ्ठाविसावा अहवाल

**प्रस्तावना:-**

लोकलेखा समितीच्या अठ्ठाविसाव्या अहवालान्वये निविदा प्रसिध्द केल्यानंतर अथवा त्या संदर्भात कार्यादेश दिल्यानंतर प्रशासकिय अथवा तांत्रिक मान्यता प्राप्त नसलेली कामे मुळ कामात समाविष्ठ केली जात असल्याने तांत्रिक अनियमितता होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिये संदर्भात कार्यवाहीच्या सूचना निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी शासनाच्या निधीतुन किंवा स्वनिधितून कामे करताना ई निविदा पध्दतीचा अवलंब करावा. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवितांना खालील प्रमाणे दक्षता घेण्यात यावी.

१. मुळ प्रशासकीय मंजूरीच्या आदेशात समाविष्ठ असलेला व तांत्रिक मान्यता असलेल्या कामांचाच समावेश निविदेत करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच मंजूर कामाच्या प्रत्येक घटकाचा निविदेमध्ये सविस्तर समावेश करण्यात यावा.

२. सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त केल्याखेरीज निविदा प्रसिध्द करु नयेत तथा कार्यादेश देण्यात येवू नयेत.

३. केंद्रीय दक्षता आयोगामार्फत या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे निविदा प्रक्रिया राबविताना पालन करण्यात यावे.

४. निविदा प्रक्रिया व कार्यादेश देणे या संपुर्ण कार्यवाहीमध्ये वित्तीय औचित्याच्या तत्वांचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

५. निविदेमध्ये समाविष्ट असलेल्या कामांव्यतिरीक्त अन्य कामे समाविष्ट करु नयेत.

**६. जुन्या निविदेमध्ये नविन (वाढीव) कामे समाविष्ट करुन कार्यादेश देऊ नये, अशी बाब आढळुन आल्यास सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.**

**७. कोणत्याही प्रकल्पात वाढीव कामे समाविष्ट करावयाची झाल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकिय व तांत्रिक पुर्व मान्यता घेऊन स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी व त्यानुसार कार्यादेश देण्यात यावेत.**

८. इमारती/रस्ते वा इतर कामांना लागु असलेल्या सार्वजनिक बाधंकाम नियमावलीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना लागु असलेल्या नियमांनुसार कामे होतील यांची दक्षता सर्व संबंधीत यंत्रणानी/नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घ्यावी.

९. उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर २०१६, अन्वये शासकिय विभागानी खरेदी करण्यासंदर्भात कार्यपध्दती विहित केली आहेत. सदर तरतुदी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना लागु केलेल्या आहेत. या शासन निर्णयानुसार विहित निविदा प्रक्रिया पार पाडली जाईल याची खातरजमा करावी.

१०. वरील सुचनानुसार काटेकोरपणे कार्यवाही होईल याबाबत संबंधित आयुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत यांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०६१२१६५०२७५२२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2018.06.12 16:51:07 +05'30'

**( शंकर जाधव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१) मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२) सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७) मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

११) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१२) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)
१३) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक विभागाच्या नागरीकांची सनदवर प्रसिध्द करण्यात यावे.
१४) नगर विकास विभाग (नवि-२) सर्व कार्यासने
१५) निवडनस्ती (नवि-२०).